# ई - पोलीस पत्रिका

*दि २२/११/२०२१* *अनु.क्र. २०९*

# (अमरावती शहर पोलीसांची २०२१ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१
## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा
### रजा

**१.जा.क्र.पोआअ/आस्था-प्रलि/सुधारीत कालबध्द/१०५२६/२०२१ अमरावती दि. २२.११.२०२१**

**सुधारीत आदेश**

खालील नमुद पोलीस अमंलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चुकीच्या दिनांकास आश्वासीत प्रगती योजना (कालबध्द पदोन्नती) मंजुर करण्यांत आलेली होती. खालील नमुद पोलीस अमंलदार यं ाना त्यांचे नावासमोर दर्शविल्ययाप्रमाणे सुधारीत दिनांकास आश्वासीत प्रगती योजना (कालबध्दी) चा लाभ मंजुर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अमंलदार नांव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त दिनांक | भरती दिनांक | विदयमान कालबध्द | सुधारीत कालबध्द पदोन्नती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा. रामबाबु घारे.७४५ | दि. ३०.११.२०२१ सेवानिवृत्त | दि. १५.०८.२०८९ | दि. ०३.०८.२००१ | दि. १५.०८.२००१ |

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/पोअधि-रुग्णनिवेदन हजर/१०५२८/२०२१ अम. दि. २२.११.२०२१**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अधिकारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये आजाराचे कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थीत होते. ते या कार्यालयात कर्तव्यावर हजर होणेकरीता दि. २२.११.२०२१ रोजी आले असता त्यांना मा. पोलीस आयुक्त यांचे समक्ष आज्ञांकीत कक्षात हजर करण्यांत आले आहे.

सदर पोलीस अधिकारी यांना दि. २२.११.२०२१ रोजी कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत येत आहे. त्यांनी नियंत्रण कक्ष, अमरावती शहर येथे तात्काळ कर्तव्यावर हजर व्हावे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | पदनाम | नेमणुक | आजारी रजेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | पांडुरंग ठाकरे | पोलीस उपनिरीक्षण | विशेष शाखा | दि. ३०.०८.२०२१ ते दि. २१.११.२०२१-८४ दिवस |

**३. जा.क्र.पोआअ/पशा-१/पोअधि-रुग्णनिवेदन हजर/१०५२७/२०२१ अम. दि. २२.११.२०२१**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अधिकारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीमध्ये आजाराचे कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थीत होते. ते या कार्यालयात कर्तव्यावर हजर होणेकरीता दि. २२.११.२०२१ रोजी आले असता त्यांना मा. पोलीस आयुक्त यांचे समक्ष आज्ञांकीत कक्षात हजर करण्यांत आले आहे.

सदर पोलीस अधिकारी यांना दि. २२.११.२०२१ रोजी कर्तव्यावर हजर करुन घेण्यांत येत आहे. त्यांनी नियंत्रण कक्ष, अमरावती शहर येथे तात्काळ कर्तव्यावर हजर व्हावे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | पदनाम | नेमणुक | आजारी रजेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | गजानन उमाळे | पोलीस उपनिरीक्षण | नियंत्रण कक्ष | दि. ०७.१०.२०२१ ते दि. २१.११.२०२१ इ ४६ दिवस |

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त /मयत

## शिक्षा

**१.जा.क्र. पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोनि(गुन्हे)-दिघे/१०५१७/२०२१ दि. २२.११.२०२१**

**आदेश**

**कसुरदारचे नाव :-** पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय दिघे. नेमणुक पोलीस स्टेशन वलगांव,अम.शहर

**थोडक्यात कसुर :-**

पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय दिघे पोलीस स्टेशन वलगांव, अमरावती शहर येथे नेमणुकीस पोलीस स्टेशन वलगांव येथे अप क्र. ३६५/२१ कलम १४३, १४४, १४७, १४८, १४९, १८८, ३२४, ३०७ भादंवि सहकलम ५१ (ब) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम सहकलम २,३,४ साथीचा रोग दि. १९.०५.२०२१ रोजी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा दाखल झाला. यातील आरोपीस दि. १९.०५.२०२१ चे १८.०३ तत्कालीन पोलीस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकुर यांनी अटक केली होती. सर्व आरोपीतांना मा. न्यायालयाने जेल दाखल केले असुन त्यातील आरेपीतांना मा. न्याययालयाकडे वेगवेगळया तारखेला जामीन अर्ज दाखल केला असुन त्यानुसार मा. न्यायायलयाला आपण मुळ तपासडायरीसह दाखल केला होता. त्यातील काही आरोपी जामीन न मिळाल्याने व सदर डायरी कोव्हीड-१९ मुळे कोर्ट अनियमीत असल्याने कोर्टातुन मिळण्यास विलंब झाला. सदर गुन्हयातील आरोपी जेलमध्ये असुन त्यांचेविरुध्द दोषारोप पत्र विहीत कालावधी ९० दिवसाचे आत सादर करणे अपेक्षित असतांना आपाण दोषारोप पत्र मा. न्यायालयात ९० दिवसाचे कालावधीनंतर दाखल केल्याचे दिसुन येत आहे. सदर गन्हयाचे तपास अधिकारी म्हणुन आपण सदर गुन्हयातील आरोपी जेलमध्ये असुन सुध्दा दोषारोपीपत्र मा. न्ययालयात दाखल करण्यांत विलंब करुन कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येत आहे.

**अंतिम आदेश**

**उपरोक्त नमुद कसुरदारर यांना तरतुदीनुसार देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.**

**२.क्र.पोआअ/वि.चौ१/निलंबन/वश्रेलि-प्रविण राणे/१०५३६/२०२१ अम. दि. २२.११.२०२१**

## निंलबन आदेश

प्रविण राणे, वरिष्ठ श्रेणी लिपीक, लेखा शाखा, पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे भविष्य निर्वाह निधी लिपीक, या कार्यासनावर दि. २०.१०.२०२१ अन्वये नेमणुकीस आहात. परंतु सदर कार्यासनावर दि. २०.१०.२०२१ अन्वये नेमणुकीस आहात. परंतु, सदर कार्यासनावर नियमीत कार्यालयीन कामकाज करीत नाहीत. त्यामुळे वरिष्ठांकडील व तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचे अंतिम भविष्य निर्वाह निधीचे प्रकरणे तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांचा महालेखाकार- नागपुर यांना प्रस्ताव सादर करणे व दतर कार्यालयान प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर कार्यासन हे अतिशय महत्वाचे असुन सदर कार्यासना वरील सर्वच प्रकारचे कामे मोठया प्रमाणात प्रभावित होण्याची दाट शक्यता आहे. सर्व कामाची सर्वस्वी जबाबदारी तुमचीच असुन तुम्ही कोणतेही काम लक्षपुर्वक करीत नसून प्रत्यक कामात टाळाटाळ करीता आहात. अतिशय गंभीर बाब आहे. स्वतःच्या कार्यासनाचे संपुर्ण काम नियमीत करणे आणि प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेवून त्यावर आवश्यक ती कार्यवाही करुन तात्काळ निकाली काढणे ही सर्वस्वी जबाबदारीचे तुमचीच आहे. परंतु तुम्ही तुमच्याकडे असलेल्या कामकाजाकडे गांभीर्याने व जबाबदारीने घेत नसन्याचे दिसून आले अशा प्रकारे तुम्ही कसुरी केलेली आहे.

यावरुन वश्रेलि. प्रविण राणे, तुम्ही तुमच्याकडे असलेल्या कामकाजाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते आहे. तरी तुमच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई अधिकन राहुन तरतुदीनुसार **सदरचे आदेश निर्गमीत केल्याचे दिनांकापासुन शासकीय सेवेतुन निलंबित करण्यांत येत आहे.**

## वेतन / वेतन संरचना / वेतन निश्चिती/वार्षिक वेतनवाढ/ संकीर्ण

**निरंक**

**( लक्ष्मण डुंबरे )**
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर, करिता

प्रत, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/ सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती करीता .